# सविस्तर जाहिरात

## अधिक्षक अभियंता, राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती कार्यालय, नाशिक

### सेवा करार पद्धतीने विवक्षीत कामांसाठी जलसंपदा विभागातील सेवानिवृत्त अधिकारी यांच्या सेवाकरार पध्दतीवर नेमणूक करण्याबाबत. जाहिरातीचा सविस्तर तपशील

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/ १३ मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक मंत्रालय मुंबई ४०००३२ दिनांक.१७/१२/२०१६ अनुसार दिलेल्या निर्देशानुसार खालील संवर्गातील सेवानिवृत्त अधिकारी यांची सेवा करार पध्दतीने या कार्यालयामधील विवक्षीत कामासाठी नेमणूक करावयाची आहे.

| अ.क्र | संवर्ग | पद संख्या |
|---|---|---|
| १ | उप अभियंता | १ |
| २ | शाखा अभियंता / सहा अभि श्रे- २ | १ |

जलसंपदा विभागातील सेवानिवृत्त अधिकारी यांची नेमणूक कंत्राटी पध्दतीने एक वर्षासाठी करावयाची आहे. सेवानिवृत्त अधिकारी नाशिक येथे जलसंपदा विभागातील सिंचन प्रकल्पांचे क्षेत्रिय स्तरावरुन प्राप्त झालेले प्रकल्पांचे प्रमा, सुप्रमा प्रस्तावांची छाननी (जलशास्त्रीय अभ्यास, संकल्पनचित्रे (Design), अंदाजपत्रके, निविदा शर्ती, आर्थिक तरतूद, भूसंपादन, पुर्नवसन, दर पृथ:करणे) करुन राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीस सादर करुन मान्यता घेणे इ. प्रकारचे ज्ञान व पुरेसा अनुभव असणे आवश्यक आहे. ईच्छुक अर्जदारांनी विहीत नमुन्यातील अर्ज अधीक्षक अभियंता, राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक **दि. ३०.११.२०१८** (सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत) प्राप्त होईल याप्रमाणे पोस्टाव्दारे किंवा प्रत्यक्ष सादर करावीत. अर्जाचे पाकीटावर "सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांच्या सेवा करार पध्दतीवर नेमणूक करण्याबाबत" असे स्पष्ट लिहून ज्या पदासाठी अर्ज सादर केला आहे त्या पदाचे नांव लिहण्यांत यावे. नियोजीत दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार करण्यांत येणार नाही. सदर सेवाकरार पध्दतीवर नेमणूकांचे आदेश हे योग्य स्तरावर अंतिम मान्यतेनंतर निर्गमीत करण्यांत येतील.

**सेवा करार पध्दतीवर भरावयाच्या पदांचा तपशिल खालीलप्रमाणे**

| अ. क्र. | संवर्ग | विवक्षित कामाचा तपशिल | जलसंपदा विभागातुन खालील पदावरुन सेवानिवृत्त झालेले अधिकारी सदर पदांकरीता अर्ज करण्यास पात्र आहे. |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| (१) | उपविभागीय अभियंता | अधीक्षक अभियंता, राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांचेकडे जलसंपदा विभागातील सिंचन प्रकल्पांचे क्षेत्रिय स्तरावरुन प्राप्त झालेले प्रकल्पांचे प्रमा/सुप्रमा प्रस्तावांची छाननी (जलशास्त्रीय अभ्यास, संकल्पनचित्रे (Design), अंदाजपत्रके, निविदा शर्ती वाढ / घटीची कारणे, भूसंपादन, पुर्नवसन, दर | उपविभागीय अभियंता |

| | | | |
|---|---|---|---|
| | | पृथ:करणे) करुन राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नाशिकच्या बैठकीसाठी प्रारुप छाननी प्रस्ताव तयार करणे. तसेच अंतिम छाननी प्रस्ताव करणे. | |
| (२) | शाखा अभियंता/ सहा.अभियंता श्रेणी २ | अधीक्षक अभियंता, राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांचेकडे जलसंपदा विभागातील सिंचन प्रकल्पांचे क्षेत्रिय स्तरावरुन प्राप्त झालेले प्रकल्पांचे प्रमा/सुप्रमा प्रस्तावांची छाननी (जलशास्त्रीय अभ्यास, संकल्पनचित्रे (Design), अंदाजपत्रके, निविदा शर्ती वाढ / घटीचे कारणे, भूसंपादन, पुर्नवसन, दर पृथ:करणे) करुन राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नाशिकच्या बैठकीसाठी प्रारुप छाननी प्रस्ताव तयार करणे. तसेच अंतिम छाननी प्रस्ताव करणे. | उपविभागीयअभियंता / शाखा अभियंता/ सहा.अभियंता श्रेणी २ |

सदर नेमणूकीकरीता लागु असलेल्या अटी व शर्ती तसेच अर्जाचा नमुना हा महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागाच्या ई-जलसेवा या वेबसाईट **https://wrd.maharashtra.gov.in** चे मुखपृष्ठावर उपलब्ध आहे. तसेच हा अर्ज व अटी / शर्ती अधीक्षक अभियंता, राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती कार्यालय, नाशिक या कार्यालयात उपलब्ध आहे.

**<u>सदर नेमणूका हा खालील सर्वसाधारण शर्ती व अटीच्या अधिन राहतील.</u>**

१. अर्ज करणा-या सेवानिवृत्त अधिकारी ज्या पदासाठी अर्ज केले आहे, त्या पदाचा विवक्षीत कामासाठी लागणारी विशेष अर्हता अथवा किमान तीन वर्षाचा (राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक) येथील कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

२. सदर नेमणूक एक वर्षासाठीच राहील. एक वर्षापेक्षा जास्त वाढविण्याची आवश्यकता भासल्यास संबंधीतांचे कामकाज व आवश्यकता पाहून नियुक्ती अधिकारी शासन मान्यतेने तसा निर्णय घेऊ शकतात.

३. सेवा करार पध्दतीने नियुक्त सेवा निवृत्त अधिकारी यांना महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२७१५/ प्र.क्र.१००/ १३ मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक मंत्रालय मुंबई ४०००३२ दिनांक.१७/१२/२०१६ मधील अटी व शर्ती लागू राहतील. तसेच शासन निर्णयासोबत असलेल्या परिशिष्ट अ नुसार मासिक परिश्रमीक म्हणुन त्यांना अनुज्ञेय राहील.

४. करारपध्दतीने नियुक्ती देण्यांत आल्यामुळे संबंधीतास शासनाच्या कोणत्याही विभागात/संवर्गात सेवा समावेशनाबाबत किंवा सामावून घेण्याबाबत वा नियमित सेवेचा इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार नसेल याबाबत अर्जदाराने रु.१००/- च्या स्टॅम्पवर प्रतिज्ञालेख देण्यांत यावा.

५. अर्ज करणा-या सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांनी त्यांची शारीरीक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असल्याबाबत जिल्हा शल्यचिकीत्सक अधिका-याचे मुळ प्रमाणपत्र द्यावे.

६. करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास नेमूणक दिलेली कामे पूर्ण करण्याची जबाबदारी संबधीत व्यक्तीची राहील व तसे बंधपत्र / हमीपत्र अटी व शर्ती संबधीत उमेदवाराला मान्य आहेत या बाबत बंधपत्र उमेदवारास रु.१००/-च्या स्टॅम्पपेपरवर देणे बंधनकारक राहील.

७. अर्ज करणा-या सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचाऱ्यां विरुध्द कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी व न्यायालयीन प्रकरण नसावे याबाबत अर्जदारांनी ज्या कार्यालयातुन सेवानिवृत्त झाले आहे, त्या संबंधीत कार्यालयाकडुन तसे प्रमाणपत्र प्राप्त करुन सादर करणे बंधनकारक आहे.

८. नियुक्ती प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

९. सदर अधिकारी / कर्मचारी त्यांच्यावर सोपविलेल्या पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल अशा कोणत्याही कामात गुंतलेला नसावा.

१०. अशा अधिकारी / कर्मचारी यांनी Conflict of interest जाहीर करणे आवश्यक राहील.

११. करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना

त्यांच्या निवृत्तीच्या वेळच्या वेतनमानास अनुसरुन प्रवास भत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील.

१२. अशा करार पद्धतीवरील अधिकारी / कर्मचारी यांनी त्यांना प्राप्त होणा-या कागदपत्रे / माहिती,कामाबाबत व आधारसामुग्री बाबत गोपनीयता पाळणे बंधनकारक राहील.

१३. नियुक्ती अधिकारी यांनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पुर्ण करणे आवश्यक राहील. करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास नेमून दिलेले काम समाधानकारक नसल्यास कोणतेही सबळ कारण न देता त्यांची सेवा समाप्त करण्यांत येईल.

१४.अर्ज करणा-या सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांनी त्यांच्या सेवेच्या शेवटच्या पाच वर्षाच्या गोपनीय. अहवालाची प्रतवारी संबंधीत कार्यालयाकडुन प्रमाणीत करुन तसे प्रमाणपत्र सादर करणे, आवश्यक आहे. तसेच प्रशस्तीपत्र / नैपुण्यपूर्वक काम केले असल्यास तसे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडण्यांत यावे.

१५. अर्ज करतेवेळी सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांनी त्यांचे कुटूंब निवृत्तीवेतन मंजुरीचे महालेखापाल कार्यालयाचे आवश्यक दस्तऐवज सादर करणे आवश्यक आहे.

१६. करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदाराने नियुक्तीच्या ठिकाणी नियुक्ती आदेश निर्गमित झालेल्या दिनांकापासुन १५ दिवसाचे आत रुजु होणे बंधनकारक राहील अन्यथा सदर नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

१७. सदर नियुक्ती राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती कार्यालय, नाशिक येथे विवक्षीत कामासाठी करण्यांत येत असून त्यासाठी योग्य उमेदवार न भेटल्यास सेवा करार पध्दतीने भरावयाची पदे रिक्त ठेवण्याचा अधिकार अबाधित राहिल.

१८. करार पद्धतीने नियुक्त करण्यात येणा-या अधिका-यांस कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार राहणार नाहीत.

१९.उपरोक्त अटी व शर्ती व्यतीरीक्त शासन/ नियुक्ती अधिकारी वेळोवेळी ठरवतील त्या अटी व शर्ती अंतीम राहतील.

# विहित नमुन्यातील अर्ज

जलसंपदा विभागा अंतर्गत राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती कार्यालयात सेवा करार पद्धतीने विवक्षीत कामांसाठी सेवानिवृत्त उपअभियंता / शाखा अभियंता यांची नेमणूक करण्यासाठीचा अर्ज.

प्रति,

मा.अधीक्षक अभियंता
राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती कार्यालय,
नाशिक.

उमेदवाराने अलिकडील काळातील स्वत:चे छायाचित्र येथे चिकटवावे

अर्ज केलेल्या पदाचे नाव :- उप अभियंता/सहा.अभि.श्रेणी-२ /शाखा अभि.

| | | |
|---|---|---|
| १ | अर्जदाराचे नाव | |
| २ | कायमचा पत्ता | |
| ३ | दुरध्वनी क्रमांक /भ्रमणध्वनी सह (अनिवार्य) | |
| ४ | ई-मेल (अनिवार्य) | |
| ५ | सध्याचा पत्ता | |
| ६ | जन्मतारीख | |
| ७ | राष्ट्रीयत्व | |
| ८ | प्रवर्ग | |
| ९ | लिंग | |
| १० | अवगत भाषा | |
| ११ | शैक्षणिक माहिती | |

१२ अनुभव -

| अ. क्र. | हुद्दा व वेतन | कार्यालयाचे नाव व पत्ता | कालावधी | कामाचा अनुभव (विस्तृत स्वरुपात) |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

१३ :- सेवानिवृत्तीचा दिनांक -

१४ :- सद्य:स्थितीत कुठे काम करीत असल्यास तपशिल —

१५ :- प्रमाणपत्र

मला पूर्णपणे माहिती आहे की, पायाभुत सुविधा निर्मिती एमपॅनलमेंट द्वारे प्रकल्पाचे क्षेत्रिय कामाकरीता सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी **उप अभियंता/ सहाय्यक अभियंता श्रेणी-२ / शाखा अभियंता** या पदाकरीता उमेदवारांची नियुक्ती करण्यात येणार आहे. सदर पद जाहिरातीत नमुद विविक्षीत कामासाठीच असून जास्तीत जास्त एक वर्षाच्या कालावधीसाठी आहे. कामाच्या निकडीनुसार **नाशिक** येथे माझी काम करण्याची तयारी आहे.

मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, माझ्या माहितीप्रमाणे वर दिलेला तपशिल सत्य व अचुक आहे यामध्ये काही चुकीची माहिती आढळल्यास माझी निवड कोणत्याही क्षणी पुर्ण सुचना शिवाय रद्द होईल व मी शिक्षेस पात्र ठरेल याची मला पूर्ण जाणीव आहे.

**ठिकाण-** **अर्जदाराची नाव व सही**

**दिनांक -**